09-04-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 08-04-2025 23:45 Page 1



# सभ्यतेने, संस्कृतीने गोव्याचे दर्शन घडवा

## सभापती रमेश तवडकर : पणजीत भारत निर्माण योगदान पुरस्कार २०२५ प्रदान सोहळा

■ टीम दैनिक हेराल्ड





पणजी : युवा कलाकार अनुष्का मोरजकर हिला पुरस्कार देताना श्रीपाद नाईक. सोबत डिलायला लोबो व इतर मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात प्रेमानंद कलशावकर (कला संस्कृती खात्यातील उत्कृष्ट अधिकारी) यांना पुरस्कार देताना रमेश तवडकर.

**पणजी, दि. ८ :** गोव्याची गोव्याबाहेर प्रतिमा आहे ती पुसून टाकण्यासाठी, आपल्या सभ्यतेने, संस्कृतीने संपन्न अशा गोव्याचे दर्शन घडविण्याची गरज आहे, तेव्हा सुंदर गोवा निर्माणाचा संकल्प घेऊन वाटचाल करूया, असे आवाहन सभापती रमेश तवडकर यांनी येथे केले. एम्पॉवर सोशिएल न्ड एज्युकेशनल ट्रस्ट आणि आपला वैभव फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने येथील मेक्वेनिझ पॅलेस थिएटरमध्ये भारत निर्माण योगदान पुरस्कार २०२५ प्रदान सोहळा रविवारी पार पडला त्यावेळी सभापती रमेश तवडकर विशेष पाहुणे म्हणून बोलत होते. या सोहळ्याला केंद्रीय ऊर्जा आणि नुतनीकरण ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक प्रमुख पाहुणे म्हणून तर गोवा मनोरंजन सोसायटीच्या उपाध्यक्ष तथा आमदार डिलायलालोबो सन्माननीय पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. व्यासपीठावर आपला वैभव फाऊंडेशन चे वैभव वीरकर, एम्पॉवर चे डॉ. घनःश्याम कोळंबे तसेच डॉ. सोमशेखर, सौमित भट, ऐश्वर्या साळगावकर, पुरस्काराचे मानकरी पोलिस अधिक्षक संतोष देसाई व पोलिस निरीक्षक विजयनाथ कवळेकर उपस्थित होते.

मी मूलतः शिक्षक पण मी राजकारणात अपघाताने आलो. मला समाजकार्याची आवड होतीच. मी १९९४ पासून सामाजिक क्षेत्रात सक्रिय आहे.श्रमधाम प्रकल्पा अंतर्गत गरजूंना दीड वर्षात चाळीस सुसज्ज घरे बांधून दिली आता गोवाभर हा प्रकल्प राबवणार आहे. लोकोत्सवाच्या माध्यमातून गोव्याची खरी ओळख दाखविण्याचा प्रयत्न आहे व आमच्या लोकत्सवाला देशभरातून तीन लाख लोकांनी उपस्थिती लावली होती. समाजात फक्त २० टक्के लोक समाजाच्या बऱ्या वाईटाचा विचार करतात,५० टक्के स्थितप्रज्ञ असतात. उरलेले चिखल फेक करणारे असतात. समाजाचे भविष्य २० टक्के लोकांच्या हातात आहे ही टक्केवारी वाढविणे गरजेचे आहे, असे रमेश तवडकर यांनी सांगितले.

वंचितांसाठी विविध उपक्रम राबवून या संस्था समाजासाठी अर्थपूर्ण योगदान देत आहेत. समाजाच्या विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्याना पुरस्कार देऊन नव्या पिढीला प्रेरणा देण्याचे कार्य स्तुत्य आहे. मानवी जीवनाची दर्जात्मक वाढ होण्यासाठी चालविलेले हे कार्य उल्लेखनीय आहे, असे श्रीपाद नाईक यांनी सांगितले.

डिलायला लोबो म्हणाल्या, समाजातील चांगल्याचा गौरव करण्याची भावना अभिनंदनीय आहे. कुठलेही क्षेत्र असो, तुमचे योगदान हे उल्लेखनीय हवे. सतत कष्ट केल्याने ध्येय साध्य होते, तेव्हा चांगले देण्याचा प्रयत्न करा. या सोहळ्यात देशातील विविध भागातील, विविध क्षेत्रातील पन्नासहून अधिक जणांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यात गोव्यातील सरकारी अधिकारी, पोलिस, पत्रकार, कलाकार यांचा समावेश होता.

पान १ वरून

## मुरगाव बंदर खाजगीकरणाच्या विरोधात निदर्शने

या निवेदनात त्यांनी निर्णय मागे घेण्याची विनंती केली असून पारंपारिक स्थानिक व्यवसायांचे रक्षण करण्यासाठी सरकारने हस्तक्षेप करावा, अशी मागणी केली आहे.स्टीव्हडोर्स असोसिएशनचे विनोद पार्कोट यांनी सांगितले की, स्थानिक स्टीव्हडोर्ससाठी उपलब्ध असलेल्या दोन सक्रिय बर्थचे खाजगीकरण झाल्यास अनेक क्षेत्रांवर मोठा परिणाम होईल. कार्गो हाताळणीत स्टीव्हडोरिंग महत्त्वाची भूमिका बजावते. क्रेन ऑपरेटर, कामगार, पर्यवेक्षक आणि मशीन ऑपरेटर यांसारख्या विविध घटकांना याचा मोठा फटका बसणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. बर्थ क्रमांक १० आणि ११ हे डेल्टा इन्फ्रालॉजिस्टिक्स वर्ल्डवाइड लिमिटेड कडे सोपवण्यात आले आहेत. त्यामुळे स्थानिक स्टीव्हडोर्स कंपन्यांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागणार आहे. पार्कोट यांच्या मते, आठ स्टीव्हडोरिंग कंपन्या बंद पडण्याच्या मार्गावर असून असंख्य कामगार बेरोजगार होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री सावंत यांनी आंदोलकांना आश्वासन दिले की, लवकरच या मुद्द्यावर बंदर अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात येईल. वास्को ट्रक ओनर्स असोसिएशनचे सदस्य हेमंत शेटगावकर, स्टीव्हडोर्सचे मिल्टन कोलासो आणि कंत्राटदार योगेश पाटील यांनीही निदर्शनांमध्ये भाग घेतला आणि या निर्णयाचा निषेध नोंदवला.डेल्टा इन्फ्रालॉजिस्टिक्स वर्ल्डवाइड लिमिटेडने एमपीए बर्थ क्रमांक १० आणि ११ चे संचालन सुरू केले आहे. हे बर्थ ३० वर्षांच्या कालावधीसाठी भाडेतत्त्वावर देण्यात आले आहेत. या निर्णयाचा स्थानिक कामगार आणि व्यावसायिकांवर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे.

## पैरा हायस्कूलचा १०० टक्के निकाल

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. ८ :** डिचोली तालुक्यातील पैरा येथील पैरा हायस्कूलचा निकाल १०० टक्के लागला आहे. या माध्यमिक विद्यालयातून २०२४ – २५ च्या शालांत परीक्षेत एकूण १८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. सोनी सुशेख मयेकर हिने ८२ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला तर चेतना लक्ष्मण वडार हिने ७६ टक्के गुण मिळवून द्वितीय तर क्रिशा हनुमान कवठणकर हिने ७५ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. तीनही क्रमांक मुलींनी पटकावले. या विद्यालयातून एकूण १८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते, त्यात तीन विद्यार्थी विशेष श्रेणीत, पाच विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर दहा विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले .

## नावातील बदल


खाली सही करणार ताशिडोमा कर्मा वांगडी, राहणार सीए-३, फ्लॅट क्र. ११, सपना गार्डन्स, चोगम रोड, आल्त पर्वरी, गोवा यांनी माझे नाव ताशिडोमा वांगडी हे बदलून ताशिडोमा कर्मा वांगडी असे केले आहे. इथून पुढे माझ्या सर्व व्यवहार व कागदपत्रांमध्ये मी ताशिडोमा कर्मा वांगडी या नावाने ओळखले जाईन.

Government of Goa
**OFFICE OF THE CIVIL REGISTRAR-CUM-SUB REGISTRAR, SALCETE**
Room No. 209, 2nd floor, Mathany Saldhana Administrative Complex, Margao - Goa
Office Tel No. 9405864458 / Office Email: crsrsalcete-rd.goa@nic.in
==============================
No. CR/SR/SAL/1067/2025
Dated 02/04/2025
**NOTICE**
Office of the Civil Registrar-cum-Sub Registrar and Special Notary, Salcete
Shri Kiran Harish Mesta, Jt. Civil Registrar-cum-Sub Registrar I & II and Special Notary in the said Judicial Division of Salcete, Margao.

In accordance with Section 346(11) of the Goa Succession Special Notaries and Inventory Proceedings Act 2012 it is hereby made public that by Deed of Declaration of Heirship dated 26/03/2025 duly recorded under Book No. 1729 at page 64 to 66 of the office, the following is recorded:
That Julio Joao Pimenta hailing from H. No. 210/A, Bironaik, Near Virobha Temple, Orlim, Salcete Goa, expired on 07th day of January in the year 2025, at Borkar Multispeciality Hospital, Margao, Salcete Goa intestate and without any other disposition of his last wish, but leaving behind his wife Mrs. Trindade Fernandes, widow as his moiety sharer and his following children (1) Mr. Darren Pimenta, bachelor, (2) Mr. Daglish Pimenta, married, to Mrs. Sharetona Rounhita Fernandes as his "sole and universal heirs" there being no one else or no other person or heir who in terms of Law of Succession in force in this State of Goa may prefer the estate left by the deceased persons.
Any person having objection to this deed may file in this office within one month from the date of its publication.
seal sd/
(Shri Kiran Harish Mesta)
Special Notary and Jt. Civil Registrar-cum-Sub Registrar I & II, Salcete Margao
To, The Government Printing Press and one in English newspaper and one in local language newspaper with a request to publish the same.
seal sd/
(Shri Kiran Harish Mesta)
Special Notary and Jt. Civil Registrar-cum-Sub Registrar I & II, Salcete Margao




डिचोली : विद्यालयाच्या यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत विजय सरदेसाई, अरुण साळकर, अभिजीत तेली, राजेश धोंड, एडना रॉड्रिगीस.


**GOVERNMENT OF GOA**
**OFFICE OF THE ASSTT. REGISTRAR OF COOPERATIVE SOCIETIES, ARBITRATION/ EXECUTION, NORTH GOA DISTRICT,**
At "Sahakar Bhavan", 1st Floor, Curti, Ponda Goa.
**ABN Case No.:- ARCS/VPK/SIOLIM/2023/ABN/2177**
VPK Urban Co-operative Credit Society Ltd.
Siolim Branch, Siolim- Goa. ........**Disputant**
V/s
1. Mr. Sandeep Ramkrishna Chodankar :H.No.73 E/8, Olaulim Nr. Residence Of Arvind Counto Pomburpa Bardez Goa.
2. Mr. Arun Datta Jalmi :H.No.663, Deulwada, Virdi, Bicholim, Goa.
3. Mr. Shabi Ramkrishna Chodankar :H.No.1136, Grande Carona, Aldona, Bardez Goa.
.......**Opponents**
**(Summons under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908)**
To,
The Opponent No. 2
WHEREAS, the above mentioned disputant society has instituted a dispute against you, Opponents for recovery of dues, in terms of section 83 of the Goa Co-operative Societies Act, 2001.
AND WHEREAS the disputant has claimed a sum of **Rs.745394.12** (Rupees Seven Lakh Forty Five Thousand Three Hundred Ninety Four and paise Twelve Only with accrued interest thereon and cost.
AND WHEREAS, the proceedings has been initiated into the same and the summons/notice issued to you at your last known address returned unserved with postal remarks **"Party Left** returned to sender".
AND WHEREAS, the disputant vide application dated 08.04.2025 prayed to publish the notice on local newspaper as substitute service as required under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908.
AND WHEREAS the court is satisfied that this is fit case for ordering substitute service by publication of notice on local newspaper.
NOW THEREFORE, the above opponents hereby summoned by this notice to appear before me in person on **08.05.2025 at 03.00 p.m.** and to produce on that day all the documents upon which they intend to rely in support of their defense.
TAKE NOTE that in default of your appearance on the date and the time as stipulated above, the matter will be heard and determined in your absence.
Given under my hand & seal of this office on this 08th day of April 2025.
SEAL
Sd/- **(Harischandra S. Gawde)**
Asstt. Registrar of Co-op Societies
ABN/EXE North Goa District Curti
Ponda- Goa.
Place: Ponda
Date: 08.04.2025


## डिचोली शांतादुर्गा विद्यालयाचे उत्तुंग यश

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ८ :** येथील विद्यावर्धक मंडळ संचालित श्री शांतादुर्गा विद्यालयाचा दहावीचा निकाल ९९.५२% लागला असून सिद्धी शिरोडकर ९३.३३% प्रथम, आर्या नाईक ९२.८३ द्वितीय, अनन्या राऊत ९२.८३ तृतीय, गंधर्व नार्वेकर ९१.८३ चौथा, सहाना नेवगी ९१.५० पाचवा, मानस फडके ९०.१७ सहावा, तर स्वानंदी सावंत ९०.१% गुण मिळवून सातवा क्रमांक प्राप्त केला आहे.

एकूण २०८ विद्यार्थ्यांपैकी २०% विद्यार्थी उत्तीर्ण झाले सहा विद्यार्थी ९०% च्या वर तसेच विज्ञान विषयात दोन विद्यार्थ्यांना शंभर टक्के गुण प्राप्त झाले.

६२ प्रथम श्रेणी ८३ द्वितीय श्रेणी तर ६० उत्तीर्ण श्रेणीत उत्तीर्ण झाले. विद्या वर्धक मंडळाचे अध्यक्ष विजय सरदेसाई, राजेश धोंड,अरुण साळकर, अभिजीत तेली, मुख्याधिकारी एडना रोड्रीगीज, यास्मिन शेट्ये, हरिप्रसाद ठाकूर, दीप्ती सावंत आदींच्या उपस्थितीत विशेष प्राविण्य मिळवण्याचा गौरव करण्यात आला. विजय सरदेसाई यांनी सर्व विद्यार्थी शिक्षक व पालकांचे अभिनंदन करताना शांतादुर्गा विद्यालयाने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले.

## 'आयडीसी' तर्फे ऑनलाइन बिल्डिंग प्लॅन अप्रुव्हल कार्यशाळेचे यशस्वी आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ८ :** गोवा औद्योगिक विकास महामंडळाने (गोवा–आयडीसी) ऑनलाइन बिल्डिंग प्लॅन अप्रूव्हल सिस्टम बाबत वास्तुविशारदांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेचा उद्देश इमारत आराखडा मंजुरी प्रक्रिया सुलभ करणे, पारदर्शकता वाढवणे आणि अनुपालन प्रणालीची कार्यक्षमता सुनिश्चित करणे हा होता.

राज्यातील ५० हून अधिक वास्तुविशारद या कार्यशाळेत सहभागी झाले होते. त्यांना ओबीपीएएस प्रणालीच्या संपूर्ण प्रक्रियेचे तपशीलवार प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. तसेच, या सुविधेच्या वापरामुळे मिळणारे फायदे, अनुपालन निकषांची पूर्तता आणि डिजिटल प्रक्रियेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी गोवा–आयडीसीचे व्यवस्थापकीय संचालक प्रविमल अभिषेक यांनी औद्योगिक पायाभूत सुविधा विकासात डिजिटल परिवर्तनाचे महत्त्व विशद केले. त्यांनी सांगितले की, ऑनलाईन बिल्डिंग प्लॅन अप्रूव्हल सिस्टम ओबीपीएएस च्या मदतीने मंजुरी प्रक्रिया अधिक पारदर्शक, गतिमान आणि कार्यक्षम झाली आहे. पूर्वी या प्रक्रियेत अनेक अडथळे होते. अर्जदारांना मंजुरी प्रक्रियेबाबत स्पष्टता मिळत नसे, बैठकांची कोणतीही सुसूत्रता नव्हती, तसेच फायलींच्या मंजुरीसाठी कोणतीही निश्चित प्रक्रिया नव्हती. त्यामुळे या प्रणालीची गरज अधिक जाणवली.

या आव्हानांचा सामना करण्यासाठी गोवा–आयडीसीने अनेक मूलभूत सुधारणा लागू केल्या. उदा. मंजुरी प्रक्रियेत सातत्य राहण्यासाठी कार्यशैली सुधारण्यात आली, तसेच वास्तुविशारद, अभियंते आणि उद्योग प्रतिनिधींना चर्चासत्रांमध्ये सहभागी करून घेतले. आताओबीपीएएस प्रणालीमुळे ही प्रक्रिया पूर्णतः ऑनलाइन झाली असून, अर्जदारांना एकाच अर्जाद्वारे तांत्रिक मंजुरी आणि बांधकाम परवाने मिळवण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

ही प्रणाली अधिक सोपी आणि प्रभावी करण्यासाठी ई–गव्ह फाउंडेशनच्या मदतीने ओबीपीएएस विकसित करण्यात आली आहे. ई–गव्ह फाउंडेशन ही संस्था २,५०० हून अधिक भारतीय शहरांमध्ये आणि १५ पेक्षा जास्त देशांमध्ये कार्यरत आहे. आम्ही नव्याने प्रणाली विकसित करण्याऐवजी, एक विश्वासार्ह आणि सिद्ध झालेले तंत्रज्ञान स्वीकारले आणि त्यात आवश्यक सुधारणा केल्या, असे श्री. अभिषेक यांनी स्पष्ट केले. कार्यशाळेच्या वेळी या प्रणालीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. सहभागी वास्तुविशारदांना या प्रणालीचा पहिल्या अनुभवाबद्दल आपले अभिप्राय मांडण्याची संधी देण्यात आली. तसेच, गोवा–आयडीसीने विकसित केलेल्या वास्तुरचना संहितेचा आढावा घेतला गेला. या संहितेमध्ये इमारत आराखडा सादर करण्याच्या प्रक्रियेशी संबंधित मार्गदर्शक तत्त्वे आणि अनुपालन निकष यांचा समावेश होता.

कार्यशाळेच्या चर्चासत्रात उपस्थित वास्तुविशारद आणि उद्योग प्रतिनिधींनी आपले अनुभव आणि सूचना मांडल्या. मंजुरी प्रक्रिया अधिक सोपी आणि जलद करण्याच्या दृष्टीने गोवा–आयडीसीने राबवलेल्या उपक्रमांचे त्यांनी स्वागत केले. डिजिटल तंत्रज्ञानाच्या मदतीने राज्यातील औद्योगिक पायाभूत सुविधांची मंजुरी प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुटसुटीत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. गोवा–आयडीसीच्या या उपक्रमामुळे औद्योगिक क्षेत्रातील बांधकाम मंजुरी प्रक्रियेत लक्षणीय सुधारणा झाली आहे. यामुळे राज्याच्या औद्योगिक विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. भविष्यात, या प्रणालीला अधिक प्रभावी करण्यासाठी आवश्यक ते बदल करण्याची तयारी महामंडळाने दर्शवली आहे.

## हाऊसीसहीत बेकायदेशीर जुगार तात्काळ बंद करा

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ८ :** हाऊसीसहीत दक्षिण गोव्यात सुरू असलेला बेकायदेशीर जुगार तात्काळ बंद करावा, असा आदेश दक्षिण गोवा जिल्हाधिकारी इग्ना क्लीट्स यांनी काढला आहे. गेल्या काही दिवसांत सासष्टी तालुक्यासहीत हाऊसीसहीत बेकायदेशीर जुगार मोठ्या प्रमाणात वाढल्याच्या तक्रारी होत्या. यासंदर्भात दक्षिण गोवा जिल्हाधिकारी इग्ना क्लीट्स यांच्याकडे तक्रारी पोहोचल्या होत्या. त्याची दखल घेऊन दक्षिण गोवा जिल्हाधिकारी क्लीट्स यांनी हा आदेश जारी केला आहे. सार्वजनिक जुगार कायदा १९७६ तरतुदीनुसार बेकायदेशीर जुगारात व्यक्तीशा व गट करून सहभागी असलेल्यांवर आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असे या आदेशात म्हटले आहे.

त्याचबरोबर करण्यात आलेल्या कारवाईचा साप्ताहिक अहवाल द्यावा, असे या आदेशात म्हटले आहे. गेल्या काही दिवसांत सासष्टी तालुक्यासहीत दक्षिण गोव्यात हाऊसीसहीत बेकायदेशीर जुगार वाढल्याच्या व त्यात जास्त करून युवावर्ग आपले हातचे गमावून बसत असल्याच्या वाढत्या तक्रारी होत्या.

मटका व पत्ता जुगार ही वाढल्याच्या ही तक्रारी होत्या. या तक्रारींची घेऊन दक्षिण गोवा जिल्हाधिकारी इग्ना क्लीट्स यांनी बेकायदेशीर सुरू असलेल्या जुगारावर कारवाई करण्याचा आदेश जारी केला असला तरी खरोखरच जुगारावर कारवाई होणार का, हा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला आहे.


**IN THE COURT OF THE JOINT MAMLATDAR-II OF PONDA, AT PONDA-GOA**
**Case No.JM-II/Mund/C2/Tal/03/2024**
1. Smt. Laxmi Narayan Chari(SD)
Through her legal heir
1.a Mr. Anand Narayan Chari
R/o H. No. 209, Talaulim Ponda Goa
.... **Applicant**
**V/S**
1. Mr. Shyamsundar Govind Sawant Talaulikar 2. Mrs. Shyamsundar Govind Sawant Talaulikar 3. Mr. Yeshwant @ Dadi Gajanan Sawant Talaulikar 4. Mrs. Vishranti Yeshwant Sawant Talaulikar 5. Mr. Jagadish Gajanan Sawant Talaulikar 6. Mrs. Jaishila Jagadish Sawant Talaulikar 7. Mr. Shripad Gajanan Sawant Talaulikar 8. Mr. Balkrishna Nagesh Chari
All R/o Talaulim Ponda Goa
.... **Opponents**
**PUBLIC NOTICE**
To
The Respondents
**WHEREAS** the above named applicant have filed an application in this Court for declaration u/s 8-A of the Goa, Daman and Diu Mundkar (Protection from Eviction) Act, 1975. And application filed by the applicant dated 01/04/2025.
**AND WHEREAS** the notice sent to the above mentioned opponents are returned back with the postal remark **"Insufficient address".** It is reported by the applicant that he is unaware of the present residential addresses of the opponents and above mentioned addressed is the last known address.
**AND WHEREAS** after considering the case of the applicant, I have come to the conclusion that this is a fit case for publishing the notice in the local newspaper.
Therefore, notice is hereby given to the above mentioned opponents to appear in this Court on **05/05/2025 at 10.30 a.m.** along with material evidence on which they wish to rely upon in person or through duly authorized agent failing which ex- parte order shall be passed and the matter will be decided in his absence.
Given under my hand and the seal of this Court dated this 1st day April, 2025.
SEAL
Sd/- **(Rosario Carvalho)**
Jt. Mamlatdar-II of Ponda
Ponda-Goa

**CHANGE IN NAME**
I **SAVIO JOSEFATO FERNANDES** Holder of Passport N1331148, House No 152/A, Vaddy Afframent, Siolim, North Goa, Bardez Goa, Pin 403517 do herby change my name from **SAVIO JOSEFAT FERNANDES** to **SAVIO JOSEFATO FERNANDES.** Hereafter in all my Dealings & Documents I will be known as **SAVIO JOSEFATO FERNANDES.**

**IN THE COURT OF THE JOINT MAMLATDAR - II OF BARDEZ TALUKA, MAPUSA, GOA**
**Case No: JM-II / MND / PUR / 03 / 2019**
Shri. Subhash Pednekar, r/o H. No. 1/99, Cunchelim, Bardez, Goa .....Applicant
V/s
1. Mr. Dion de Silva, r/o Cunchelim, Bardez, Goa 2. Smt. Clara Aurora De Braganza, r/o Mapusa, Bardez, Goa ....Opponents
**PUBLICATION NOTICE**
To The Opponents
Whereas, the applicant has approached this Court as he is willing to pay the purchase price as per order dated 19th October 2023 in Case No. JM-II/MND/PUR/03/2019.
AND WHEREAS, the applicant stated in his application that the notice sent to the opponent by registered A.D. is returned unserved. The applicant has therefore prayed for substitute service as he is not aware of any other address of the opponent, by way of publication in the local newspaper and the same has been granted by this Court being genuine.
AND WHEREAS, this Court is satisfied that this is a fit case for ordering such service. Now therefore notice is hereby given to you under order V of Rule 20(1A) of the C.P.C. 1908 to appear before this Court either in person or by an agent duly instructed and able to answer all material question relating to the application on **28/04/2025 at 10.30 a.m.** failing which the application shall be heard and determined ex-parte.
Given under my hand and seal of this court on this 18th day of March 2025.
Sd/- Shannon Chika de Almeida
Joint Mamlatdar Bardez ii Taluka
Mapusa, Goa
Seal

**GOVERNMENT OF GOA**
**OFFICE OF THE ASSTT. REGISTRAR OF COOPERATIVE SOCIETIES, ARBITRATION/ EXECUTION, NORTH GOA DISTRICT,**
At "Sahakar Bhavan", 1st Floor, Curti, Ponda Goa.
**ABN Case No.:- ARCS/VPK/SIOLIM/2023/ABN/2171**
VPK Urban Co-operative Credit Society Ltd.
Siolim Branch, Siolim- Goa. ........Disputant
**V/s**
1.Mr. Jabiulla Jamal Aattar :H.No.351/B, Munang Vaddo Assagao Bardez Goa
2.Mr.Ulhas Vinayak Sawant :H.No.351, MunangWada, Assagao Bardez Goa.
3.Mr.Ravikant Baddu Chavan :H.No.480/A, Muddo Vaddo Parra Bardez Goa.
.......**Opponents**
(Summons under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908)
To,
The Opponent No. 1
WHEREAS, the above mentioned disputant society has instituted a dispute against you, Opponents for recovery of dues, in terms of section 83 of the Goa Co-operative Societies Act, 2001.
AND WHEREAS the disputant has claimed a sum of **Rs.171439.22** (Rupees One Lakh Seventy One Thousand Four Hundred Thirty Nine and paise Twenty Two Only with accrued interest thereon and cost.
AND WHEREAS, the proceedings has been initiated into the same and the summons/notice issued to you at your last known address returned unserved with postal remarks **"Addressee Left** returned to sender".
AND WHEREAS, the disputant vide application dated 08.04.2025 prayed to publish the notice on local newspaper as substitute service as required under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908.
AND WHEREAS the court is satisfied that this is fit case for ordering substitute service by publication of notice on local newspaper.
NOW THEREFORE, the above opponents hereby summoned by this notice to appear before me in person on **08.05.2025 at 03.00 p.m.** and to produce on that day all the documents upon which they intend to rely in support of their defense.
TAKE NOTE that in default of your appearance on the date and the time as stipulated above, the matter will be heard and determined in your absence.
Given under my hand & seal of this office on this 08th day of April 2025.
SEAL
Sd/- **(Harischandra S. Gawde)**
Asstt. Registrar of Co-op Societies
ABN/EXE North Goa District Curti
Ponda- Goa.
Place: Ponda
Date: 08.04.2025


## पेडणेतील १९ हायस्कूलचा शंभर टक्के निकाल

### 'व्हायकाऊंट'ची सलग १६व्या वर्षी १००% निकालाची परंपरा कायम

■ टीम दैनिक हेराल्ड



पेडणे, दि. ८ : शालान्त परीक्षेने घेतलेल्या परीक्षेमध्ये पेडणे तालुक्यातील एकूण ३१ हायस्कूल पैकी १९ हायस्कूलचा निकाल शंभर टक्के लागला. त्यामध्ये ४ सरकारी हायस्कूल होती. त्यातील ३ हायस्कूलने १००% निकाल लावून आपला विक्रम प्रस्थापित केला. तर पेडणे येथील विस्काउंड हायस्कूलने सलग सोळा वर्षे १००% निकालाची परंपरा कायम राखली.

व्हायकाउंट हायस्कूल पेडणे यामध्ये ७५ विद्यार्थी बसले होते ७५ ही विद्यार्थी उत्तीर्ण झाले त्यामुळे १००% निकाल, सरकारी हायस्कूल आगरवाडा सरकारी हायस्कूलमध्ये एकूण २२ विद्यार्थ्यांपकी २१ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे ९५.४५ न्यू इंग्लिश हायस्कूल केरी २३ विद्यार्थ्यांपकी २३ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे शंभर टक्के निकाल. मांद्रे हायस्कूल एकूण ६३ विद्यार्थी बसले होते. त्यातील ६१ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे ९६.८३% निकाल लागला. सरकारी हायस्कूल तोरसे ३० विद्यार्थ्यांपैकी ३० विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शंभर टक्के निकाल. हरमल पंचक्रोशी हायस्कूलमध्ये सर्वाधिक ११६ विद्यार्थी शालान्त परीक्षेत बसले होते. त्यातील ११६ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शंभर टक्के निकाल लागला. श्री भगवती हायस्कूल पेडणेचे एकूण ४५ विद्यार्थ्यांपैकी ४२ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९३.३३% निकाल लागला. कमळेश्वर हायस्कूल कोरगाव २१ विद्यार्थ्यांपैकी २१ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन १००% निकाल. लोकशिक्षण हायस्कूल धारगळ २० विद्यार्थ्यांपैकी १९ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९५% निकाल लागला.

विद्या प्रसारक हायस्कूल मोरजी ३२ विद्यार्थ्यांपैकी ३२ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन १००% निकाल लागला. हुतात्मा बापू गावस चांदेल हायस्कूल वीस विद्यार्थ्यांपैकी २० विद्यार्थी उत्तीर्ण होऊन १००% निकाल. मांगरीश हायस्कूल आरोबा १२ विद्यार्थ्यांपैकी १२ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शंभर टक्के निकाल. प्रज्ञा हायस्कूल कोरगाव १५ विद्यार्थ्यांपैकी पंधरा विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शंभर टक्के निकाल. रमाकांत खलब हायस्कूलचा २४ विद्यार्थ्यांपैकी २२ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे ९१.६७% निकाल. श्री दुर्गा हायस्कूल पारसेचा १२ विद्यार्थ्यांपैकी १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे शंभर टक्के निकाल. सरकारी हायस्कूल वजरी १७ विद्यार्थ्यांपैकी १७ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे शंभर टक्के निकाल. कमळेश्वर हायस्कूल पेठेचा वाडा कोरगाव २१ विद्यार्थ्यांपैकी २१ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे शंभर टक्के निकाल. डॉन बॉस्को तुये हायस्कूलचा ३२ विद्यार्थ्यापकी ३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे शंभर टक्के निकाल. आयडियल हायस्कूल पालये ११ विद्यार्थ्यांपैकी आठ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे ७३.७३% निकाल. सातेरी विद्यामंदिर इब्रामपूरचा २३ विद्यार्थ्यांपैकी २२ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे ९५.६५% निकाल. लेडी माऊंट कार्मेल हरमल ४६ विद्यार्थ्यांपैकी ४५ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे ९७.८३% निकाल

पीटर आलवारीस मेमोरियल हायस्कूल मोरजीच्या २० विद्यार्थ्यांपैकी १९ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे ९५% निकाल. पार्से हायस्कूल ३४ विद्यार्थ्यांपैकी ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे शंभर टक्के निकाल. सरकारी हायस्कूल दाडाची वाडी २५ विद्यार्थ्यांपैकी २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे शंभर टक्के निकाल. विकास हायस्कूल मालपे चा २६ वद्यार्थ्यांपैकी २६ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे शंभर टक्के निकाल. सेंट जोसेफ हायस्कूल ४७ विद्यार्थ्यांपैकी ४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे ९३.६२% निकाल. रोझरी हायस्कूल मांद्रे ४६ विद्यार्थ्यांपैकी ४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे ९५.६५% निकाल. सेंट जेवियर कोरगाव २३ विद्यार्थ्यांपैकी २२ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे ९५.६५% निकाल. साई विद्यामंदिर तोरसे २८ पैकी २८ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे शंभर टक्के निकाल. सेंट ऍनी हायस्कूल थर्मास १३ विद्यार्थ्यांपैकी १३ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे शंभर टक्के निकाल. ज्ञानदीप विद्यालय पूर्वा कासारवर्णे नव विद्यार्थ्यांपैकी नऊ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे शंभर टक्के निकाल लागला.